# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक - अशोक हनवते. मो - 9421094991,7264079990








लातूर वर्ष ३ रे अंक २४८ वा गुरूवार दि.०७ मार्च २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## घनसरगाव - रेणापूर रस्त्यावरील रेणा नदीवरच्या नवीन पुलाचे आ. कराड यांच्या हस्ते लोकार्पण

लातूर : - रेणापूर तालुक्यातील मौजे घनसरगाव ते रेणापूर रस्त्यावरील नव्याने बांधण्यात आलेल्या दीड कोटीहून अधिक रुपये खर्चाच्या रेणा नदीवरील पुलाचे लोकार्पण भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या शुभहस्ते मंगळवारी सायंकाळी करण्यात आले. पुलाच्या उभारणीमुळे अनेकांची मोठी गैरसोय दूर झाली आहे उद्घाटनाच्या निमित्ताने फटाके फोडून मोठ्या उत्साहाच्या वातावरणात आ कराड यांचे स्वागत केले.



यावेळी भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, ओबीसी मोर्चाचे प्रदेश सचिव भागवत सोट, जिल्हा सरचिटणीस महेंद्र गोडभरले, तालुकाध्यक्ष ॲड. दशरथ सरवदे, विधानसभा अध्यक्ष अनिल भिसे, संगायो समिती अध्यक्ष वसंत करमुडे, भाजपाचे सतीश आंबेकर, रेणापूरचे पहिले नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे, माजी सभापती रमेश सोनवणे, माजी उपसभापती आनंत चव्हाण, रामराव मोरे, श्रीकृष्ण जाधव, शीला आचार्य, अनुसया फड, लक्ष्मण जाधव, श्रीमंत नागरगोजे, घनसरगावच्या सरपंच महानंदा दरेकर, उपसरपंच विमलबाई कापसे, शरद दरेकर, अच्युत कातळे यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

घनसरगाव येथील नागरिकांना रेणापूर अथवा लातूरला जाण्यासाठी पानगाव रस्त्याने जावे लागत असे. या रस्त्यावरून घनसरगाव ते रेणापूर दरम्यानचे अंतर ८ ते १० किलोमीटर असून रेणा नदीवर पुलाचे काम पूर्ण झाल्याने वेळेच्या बचतीबरोबरच प्रवासाचे अंतरही मोठ्या प्रमाणात कमी होऊन घनसरगाव पासून अवघ्या साडेतीन ते चार किलोमीटर अंतर रेणापूरचा प्रवास झाला आहे. रेणा नदीवर पुल व्हावा अशी अनेक वर्षापासून घनसरगावकरांची असलेली मागणी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नातून राज्य शासनाने पूर्ण केली आहे.

रेणा नदीवरील १ कोटी ६१ लक्ष रुपये खर्चाच्या पुलाचे लोकार्पण भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या शुभहस्ते मंगळवारी सायंकाळी करण्यात आले. यावेळी फटाके फोडून मोठ्या उत्साहाच्या आणि आनंदाच्या वातावरणात आ. कराड यांचे स्वागत करण्यात आले. घनसरगाव येथील ग्रामपंचायत आणि ग्रामस्थांच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात आला, त्याचबरोबर स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच पन्नास लाख रुपये खर्चाचा रस्ता मंजूर केल्याबद्दल घनसरगाव तांडा येथील नागरिकांनी आ. कराड यांचा सत्कार करून आभार व्यक्त केले.

वर्षानुवर्ष दुर्लक्षित असलेले मतदार संघातील विकासाचे प्रश्न मार्गी लागत असल्याचा मनस्वी आनंद आहे असे सांगून यावेळी बोलताना आ. रमेशअप्पा कराड म्हणाले की, पक्षाने मला दिलेल्या आमदारकीच्या माध्यमातून गोरगरीब सर्वसामान्य माणसाला न्याय देण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न करीत आहे, केंद्र आणि राज्य शासनाच्या माध्यमातून गावागावात वाडी वस्तीत विकास कामासाठी मोठ्या प्रमाणात निधी मंजूर करून आणला, येणाऱ्या काळात होणाऱ्या निवडणुकीत नरेंद्रजी मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्यासाठी लातूरचा भाजपाचा खासदार बहुमताने विजयी करण्याचे आवाहन केले.

प्रारंभी सरपंच महानंदाताई दरेकर आणि ॲड. निवृत्ती जाधव यांनी आपले मनोगत व्यक्त करून आ. रमेशआप्पा कराड यांच्यामुळे घनसरगावात विविध विकास कामासाठी कोट्यावधी रुपयाचा निधी मिळाल्याचे सांगून येणाऱ्या काळात घनसरगाव येथील नागरिकांची त्यांच्या पाठीशी खंबीरपणे साथ राहील असे बोलून दाखवले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले तर शेवटी निखिल जाधव यांनी आभार मानले.

याप्रसंगी भाजपाचे हेमंत दरेकर, प्रवीण शिंदे, हनुमंत पवार, विजय चव्हाण, दत्ता सरवदे, संतोष राठोड, शेख अजीम, राजकुमार आलापूरे, गुणवंत पाटील, प्रकाश पवार, भारत शिंदे, सचिन शिंदे, रत्नमाला पवार, सुरेश जाधव, अनंत सूर्यवंशी, राजुदास राठोड, ओम मोरे, रवींद्र पवार, भानुदास राठोड, प्रकाश जाधव, रमाकांत कांबळे, बाळासाहेब राठोड, हरिभाऊ राठोड, चंद्रकांत पवार, साहेबराव शिंदे, अशोक शिंदे, वामन पवार, रामेश्वर सूर्यवंशी, रंगनाथराव शिंदे यांच्यासह भाजपाचे लोकप्रतिनिधी पदाधिकारी कार्यकर्ते घनसरगाव येथील ग्रामस्थ महिला पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## स्व. खाशाबा जाधव चषक राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेच्या बोधचिन्हाचे उदगीर येथे अनावरण




लातूर (जिमाका): क्रीडा व युवक सेवा संचालनालय आणि महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघ यांच्यावतीने उदगीर येथे ८ ते १२ मार्च २०२४ दरम्यान स्व. खाशाबा जाधव चषक राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेच्या बोधचिन्हाचे आज उदगीर शासकीय विश्रामगृह येथे अनावरण करण्यात आले. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, सहायक जिल्हाधिकारी नमन गोयल, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे, जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे जिल्हाधिकारी कार्यालय येथून दूरदृश्य प्रणालीद्वारे या कार्यक्रमास उपस्थित होते. तसेच उदगीर येथे उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे, क्रीडा व युवक संचालक युवराज नाईक, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष राहुल केंद्रे, माजी नगराध्यक्ष सुधीर भोसले उपस्थित होते. महाराष्ट्रात कुस्ती क्रीडा प्रकारचे वेगळे आकर्षण आहे. लातूर जिल्ह्यात उदगीर येथे आयोजित करण्यात आलेल्या स्व. खाशाबा जाधव चषक राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेमुळे जिल्ह्यातील कुस्तीप्रेमींना नवी प्रेरणा मिळेल. तसेच या जिल्ह्यात खाशाबा जाधव यांच्यासारखे कुस्तीपटू घडण्यास मदत होईल, असा विश्वास जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी यावेळी व्यक्त केला. तसेच राज्यातील ३६० खेळाडू व संघ व्यवस्थापक या स्पर्धेमध्ये सहभागी होणार असून जिल्ह्यातील कुस्तीप्रेमींनी या स्पर्धेस मोठ्या संख्येने उपस्थित राहून खेळाडूंना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.


## पवनीमधील गोशाळेत ३० जनावरांचा मृत्यू

भंडारा : भंडा-याच्या पवनी येथील गोशाळेत चारा - पाण्याविना ३० जनावरांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडलीये. या प्रकरणी पवनी पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. गडचिरोलीतील कुरखेडा पोलिसांनी कत्तलखान्यात नेणा-या जनावरांना ताब्यात घेऊन धानोरीतील बळीराम गौशाळेत दोन दिवसांपूर्वी पाठवले होते. मात्र, बळीराम गोशाळेत चारा आणि पाण्याची व्यवस्था नव्हती. त्यामुळे ३० जनावरे मृत पावली.याप्रकरणी पवनी पोलिसांनी गोशाळेच्या एका संचालकाला ताब्यात घेतले आहे. गोशाळेत जनावरांना ठेवण्यासाठी शेड पाणी आणि चा-याची व्यवस्था करणे गरजेचे असताना, या गोशाळेकडे स्वत:च्या मालकीचे शेड नव्हतं. ही सर्व जनावरे उघड्यावर ठेवण्यात आल्याची गंभीर बाब समोर आली आहे.दरम्यान, कत्तलखान्याकडे जाणा-या जनावरांची सुटका करुन भंडारा जिल्ह्यातील पवनी तालुक्यातील धानोरी या गावात असलेल्या बळीराम गौशाळेत ठेवण्यात आलं होतं. मात्र, यातील ३० जनावरांचा चारा पाण्याविना मृत्यू झाल्याची घटना आज दुपारी समोर आली आहे.

## पानगावातील विठ्ठल मंदिराचे होणार संवर्धन १० कोटींचा निधी जाहीर झाल्याबद्दल आमदार धिरज देशमुख यांचा ग्रामस्थांच्या वतीने जाहीर सत्कार

**शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी विठ्ठलाकडे साकडे**

पानगाव येथे आल्यानंतर प्रथम प्रतिपंढरपूर मानल्या जाणाऱ्या श्री विठ्ठल मंदिरात जावून 'लातूर ग्रामीण'चे आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी मनोभावे पूजा केली. शेतकऱ्यांच्या सर्व व्यथा दूर व्हाव्यात, तरुणांच्या, महिलांच्या, सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांची सोडवणूक व्हावी, त्यांची उन्नती साधली जावी, असे साकडे त्यांनी यावेळी घातले.





लातूर : 'लातूर ग्रामीण'चे आमदार धिरज विलासराव देशमुख यांच्या प्रयत्नांमुळे पानगाव येथील श्री विठ्ठल मंदिराच्या जतन व संवर्धनासाठी सुमारे १० कोटी रुपयांचा निधी नुकताच मंजूर झाला. याबदल श्री विठ्ठल मंदीर ट्रस्ट व ग्रामस्थांच्या वतीने आमदार धिरज देशमुख यांचा पानगाव येथे बुधवारी (ता. ६) जाहीर सत्कार करण्यात आला. यावेळी रेणापूरच्या तहसीलदार मंजुषा भगत, नायब तहसीलदार श्रावण उगले, लातूर जिल्हा बँकेचे व्हाईस चेअरमन प्रमोद जाधव, रेणा कारखान्याचे चेअरमन सर्जेराव मोरे, बाजार समितीचे माजी सभापती चंद्रचूड चव्हाण, श्री विठ्ठल मंदीर ट्रस्टचे अध्यक्ष प्रदीप कुलकर्णी, बाजार समितीचे सभापती उमाकांत खलंग्रे, जिल्हा बँकेचे संचालक अनुप शेळके, रेणाचे व्हाईस चेअरमन अनंतराव देशमुख, चंद्रकांत आरडले, रमेश सूर्यवंशी, शेषराव हाके पाटील, स्वाती उमेश सोमाणी, सरपंच गयाबाई कस्पटे, उपसरपंच शिवाजीराव आचार्य, विवेक चव्हाण, सिद्धेश्वर गालफाडे, उमर पठाण, अभिजीत चव्हाण, किरण हनवते, गजानन फुलारी, बी. आचार्य, संजय हरिदास, सिध्देश्वर आचार्य, विश्वनाथ कागले, प्रवीण माने, मुकेश राजमाने, बाळासाहेब करमुडे, गुलाबराव चव्हाण उपस्थित होते.

आमदार धिरज देशमुख म्हणाले, ऐतिहासिक वारसा लाभलेले श्री विठ्ठल मंदीर हे वास्तूशिल्पकलेचे उत्तम उदाहरण आहे. येथे अनेक शिल्प कोरली गेलेली असून हे मंदिर ११ व्या शतकातील असावे, असे म्हंटले जाते. त्यामुळे या पुरातन वास्तूचे जतन झाले पाहिजे यासाठी आम्ही पुढाकार घेतला होता. सरकारकडे पाठपुरावा केला होता. अमित विलासराव देशमुख हे सांस्कृतिक कार्यमंत्री असताना त्यांच्या प्रयत्नांतून या मंदिराचा विकास आराखडा तयार झाला. त्यामुळेच ९ कोटी ३५ लाख रुपयांचा हा निधी मंजूर होऊ शकला, याचा आनंद आहे. हा निधी मंजूर केल्याबद्दल शासनाचेही मी आभार मानतो. या मंदिराच्या विकासासाठी आणखी ८ कोटी रुपयांच्या निधीचा प्रस्ताव आम्ही पाठविला आहे. तोही शासनाकडून आम्ही मंजूर करून आणू, असेही त्यांनी यावेळी जाहीर केले.

## 'खेलो इंडिया'तील पदक विजेते सरकारी नोकरीत पात्र ठरणार

नवी दिल्ली : खेलो इंडिया स्पर्धांमध्ये पदक विजेते सरकारी नोक-यांसाठी पात्र ठरतील, नव्या धोरणानुसार हा बदल करण्यात आला आहे, अशी माहिती क्रीडा मंत्री अनुराग ठाकूर यांनी दिली.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सक्षम क्रीडा इकोसिस्टम आणि तळागाळातील क्रीडा प्रतिभेचे पालनपोषण करण्याच्या दूरदृष्टीच्या धोरणानुसार आणि खेळाडूंना करियरचा मार्ग खुला करण्याच्या विचारांनुसार सरकारी नोक-यांचा हा पर्याय तयार करण्यात आल्याचे अनुराग ठाकूर यांनी सांगितले.विविध आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये पदके मिळवणा-या खेळाडूंसाठी सरकारी नोक-या देण्यात येत होत्याच आता आम्ही खेलो इंडिया, युवा विद्यापीठ स्पर्धा, पॅरा आणि हिवाळी स्पर्धांतील विजेत्यांसाठीही नोक-यांचा मार्ग तयार केला आहे, असे ठाकूर यांनी 'एक्स' या सोशल मिडीयावर म्हटले आहे. केंद्र सरकारच्या या धोरणामुळे भारत क्रिडा क्षेत्रात सुपर पॉवर होईल, असा विश्वास ठाकूर यांनी व्यक्त केला.तळागाळामध्ये क्रीडा संस्कृती जागवण्यासाठी आणि तरुण खेळाडूंना स्फूर्ती देत स्पर्धांचे नवे दालन उभे करण्यासाठी २०१८ मध्ये खेलो इंडिया हा उपक्रम मोदी सरकारने सुरु केला. या स्पर्धांना आता भरभरून पाठींबा मिळत आहे. देशातील गुणवत्ता प्रकर्षाने पुढे येत आहे, असेही अनुराग ठाकूर म्हणाले.



लातूर जिल्हा पोलीस दलाच्या वार्षिक तपासणी निमित्त नांदेड परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक डॉ. श्री. शशिकांत महावरकर यांच्या उपस्थितीत परेड कमांडर पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांच्या नेतृत्वात पोलीस मुख्यालयाच्या कवायत मैदानावर घेण्यात आलेल्या परेड दरम्यानचे काही क्षणचित्रे..

## आमदार धिरज देशमुख यांच्याकडून सय्यद कुटुंबीयांचे सांत्वन

रेणापूर : रेणापूर शहर काँग्रेसचे अध्यक्ष मतीन अली सय्यद यांचे वडील सय्यद इलाहीबक्ष महेबूब अली यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या रेणापूर येथील निवासस्थानी भेट देऊन 'लातूर ग्रामीण'चे आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी सय्यद कुटुंबीयांचे आज सांत्वन केले. यावेळी प्रमोद जाधव, शेषराव हाके पाटील, गोविंद पाटील, मुकेश राजे, दीपक पाटील, हकीम अली सय्यद, रफीक अली सय्यद, मकसूद अली सय्यद, अतीक अली सय्यद, हणमंत पवार, प्रमोद काळे, सचिन इगे, प्रवीण माने, रघुनाथ शिंदे, भूषण पनुरे, रामलिंग जोगदंड, अजय चक्रे, बिलाल अदनान, विश्वनाथ कागले, शेख नसीर अली आदी उपस्थित होते.



## संपादकीय....

# मॉल संस्कृती आणि ग्राहक

सूर्यकांत पाठक भारतात आकारास आलेल्या मॉलनी ग्राहकांच्या जीवनशैलीत कायापालट केला असून, ही बाब खरी आहे. त्याचवेळी किरकोळ बाजारातील व्यावसायिक एकवटण्यास आणि अधिक संघटित होण्यास मदत मिळाली आहे. मॉलमुळे भारतीय ग्राहकांची जीवनशैली पूर्णपणे बदलून गेली आहे.लोकसंख्येतील वाढ, अपेक्षांमधील बदल आणि तंत्रज्ञानातील विकासाचा वस्तू आणि सेवांच्या विक्रीवर आणि विक्रीच्या शैलीवर परिणाम झाल्याचे दिसून येते. या संक्रमणात ग्राहकांविषयी व्यक्त होणारा भावनिक ओलावा क्रमशः कमी–कमी झाल्याचे दिसून येत असले, तरी सेवा–सुविधांमध्ये प्रचंड वाढ झाली आहे, हे मान्य करावे लागेल. पूर्वीच्या काळी गल्लीतल्या किराणा दुकानदाराला सर्व ग्राहकांची नावे तोंडपाठ असायची. एवढेच नव्हे, तर प्रत्येक ग्राहकाचा नोकरीधंदा काय आहे, त्याच्या घरात किती माणसे आहेत, मुले काय शिकतात, हेही त्याला ठाऊक असायचे. दुकानात गेले की, घरगुती भाषेत ग्राहकाचे स्वागत होत असे. वर्तमानपत्राच्या त्रिकोणी घडीत डाळ, साखर घेऊन पुड्याच्या दोर्याने बांधता–बांधता घरातल्या वयोवृद्ध, आजारी व्यक्तींच्या तब्येतीची विचारपूस दुकानदाराकडून आस्थेने केली जायची. मुलांना किती मार्क पडले, हेही तो विचारायचा. नोकरदारांना महिन्यातून एकदाच उत्पन्न मिळते; मात्र दुकानाची पायरी त्याला जवळजवळ रोज चढावी लागते, हे माहीत असल्यामुळे नियमित ग्राहकांची 'खाती' दुकानदाराकडे असायची. मालाची यादी घेऊन लहान मुलांना दुकानात पाठवले जायचे. दुकानदार त्याच्याकडच्या पिशव्या काऊंटरवरून आत घेऊन माल बांधून होईपर्यंत लहान मुलांना चॉकलेट–गोळ्या द्यायचा.रावळगावचं कडक चॉकलेट, पारलेचे मऊ चॉकलेट, लिमलेटच्या गोळ्या आणि पेपरमिंट एवढीच 'व्हरायटी' उपलब्ध असायची. तेथून ते मॉल संस्कृतीपर्यंतचा प्रवास पूर्ण करण्यासाठी आपला बराच काळ गेला आहे. एकेकाळी वेगवेगळ्या सामानासाठी वेगवेगळ्या दुकानांवर जावे लागत असे. हळूहळू सुपर बाजार मॉलमध्ये परावर्तित झाला. मॉल संस्कृती ही वास्तविक लोकांची मानसिकता लक्षात घेऊन अस्तित्वात आणली आहे. मॉल हे पूर्णपणे ग्राहकांना आकर्षित करण्याचे केंद्र बनले असून, त्यानुसारच रचना केली आहे. मॉलबाहेरच खाण्यापिण्याचे स्वादिष्ट पदार्थ, चटपटीत, मसालेदार खाद्यपदार्थ ग्राहकांना अधिक आकर्षित करणारे असतात. मॉल संस्कृती नावानुसार प्रत्येक लहान गोष्टीला व्यापक रूपातून आणि आकर्षक पद्धतीने सादर करत असते. एवढेच नाही, तर मॉलचे नावही मोठे आणि उठावदार दिसेल या पद्धतीने लावण्यात येते. त्यामुळे कोणत्याही व्यक्तीच्या नजरेत मॉलचे नाव कोठूनही दिसते आणि ते नजरेत भरते.आणखी एक महत्त्वाची गोष्ट आणि त्याकडे सहजासहजी कोणाचे लक्ष जात नाही आणि ती म्हणजे मॉलला जाण्यासाठी वेळेचे बंधन नसणे. कोणत्याही मॉलमध्ये घड्याळ नसते, यामागचा उद्देश ग्राहकांना वेळेच्या बंधनापासून दूर नेणे, जेणेकरून आपण मॉलमध्ये पाऊल टाकू तेव्हा आपल्याला वेळेचे भान राहणार नाही. जोपर्यंत आपला खिसा रिकामा होत नाही, तोपर्यंत शॉपिंग करण्याची मानसिकता तयार करण्याचे काम मॉलच्या वातावरणाकडून केले जाते. मॉल संस्कृतीने भारतीय खरेदीच्या पद्धतीने क्रांतिकारी बदल घडवून आणला आहे, असे आपण म्हणू शकतो.एखाद्या दुकानात उन्हाच्या तीव्र झळा सहन करत खरेदी करण्याऐवजी वातानुकूलित मॉलमध्ये खरेदीचा आनंद लुटला जात आहे. मॉलमध्ये खरेदी केल्याने ग्राहकांना चांगले, गुणवत्तापूर्ण, ब्रँडेड उत्पादन खरेदी करण्याची इच्छा पूर्ण होते आणि त्यामुळे समाधान लाभते. शॉपिंग मॉलनी भारतात नवीन संस्कृतीला जन्म दिला आहे. ही संस्कृती पारंपरिक खरेदी संस्कृतीपेक्षा वेगळी आहे. भारतात उत्पन्न वाढल्याने बाजारपेठ क्षेत्रात लोकांना काम करण्याची संधी नव्याने उपलब्ध होत आहे. त्यामुळे मध्यमवर्गीय कुटुंबांच्या जीवनशैलीत सुधारणा आणि बदल झालेला आहे. मॉलमुळे भारतीय ग्राहकांची जीवनशैली पूर्णपणे बदलून गेली आहे. किरकोळ बाजार संघटित होण्यास मदत मिळत आहे.

# ही अंबानी मंडळी मोठी गोड, छान, विचारी आहेत, पण

अनंत अंबानी आणि राधिका मर्चंट यांच्या प्री वेडिंग समारंभाने वेधून घेतलेले सगळ्यांचे लक्ष ही बाब भारतातील राजकीय अर्थव्यवस्था आणि संस्कृती या दोहोंमध्ये झालेल्या मोठ्या बदलांचे दृश्य स्वरुप आहे. या समारंभात आधीच चित्रित केलेले व्हिडिओ चित्रण प्रदर्शित करणे, या एकूणच कार्यक्रमाभोवती सातत्याने वलयाचे कोंदण असेल याची नीट व्यवस्था करणे यात आश्चर्य वाटावे असे काहीच नाही. मानवी दृष्टीकोनातून पाहिले तर या कार्यक्रमाची पटकथा कमालीची मोहक आहे. संपत्ती, बाहुबळ, वलयांकितता, कौटुंबिक मूल्ये, धार्मिकता आणि सूरज बडजात्यांनाही गुंफता येणार नाही अशा वैयक्तिक संघर्षाची किनार असे सगळ्याचेच या पटकथेत परिपूर्ण मिश्रण आहे. या सगळ्या कहाणीत आत्यंतिक संमोहक असेही काहीतरी आहे.संपत्तीचे असे प्रदर्शन करण्यामधून लोकांमध्ये मत्सर वा संताप निर्माण होतो, असे जे बुद्धीजीवी वर्गाला वाटते, ते फारसे खरे नाही. माणूस सहसा त्याच्या जवळच्या किंवा निकटतम लोकांशी जी स्पर्धा करतो, तेव्हा त्यातून ईर्ष्या निर्माण होते. ती सर्वसाधारणपणे श्रीमंतांबद्दल नसते. आपल्याकडे आत्यंतिक टोकाची असमानता आहे. तेव्हा अशा समाजात श्रीमंतीच्या अशा प्रदर्शनांबद्दल काहीतरी अजब, विकृत प्रतिक्रिया असू शकतात. पण एखाद्याकडे खूप संपत्ती असेल, त्याने प्रचंड यश मिळवले असेल, तर बाकीच्यांना ते पहावत नाही, असे म्हणत त्या नाराजी किंवा विकृतीवर यशस्वी माणसाच्या प्रशंसेचे पांघरूण घातले जाते. एकूण काय, तर संपत्तीचे प्रदर्शन करणे अनावश्यक असेल, तर त्या प्रदर्शनाबद्दल राग व्यक्त करणे त्याहूनही अनावश्यक आहे. श्रीमंतांबद्दल सामान्यांना 'विचित्र सहानुभूती' असते असे अर्थतज्ज्ञ डम स्मिथ यांचे म्हणणे होते.श्रीमंतांनी केलेल्या श्रीमंतीच्या प्रदर्शनातून सामान्य लोकांच्या मनात एक प्रकारची प्रेरणा निर्माण होते आणि श्रीमंतीतून, पैशांमधून निर्माण होणारा आनंद कसा असू शकतो याची ठोस प्रतिमा तयार होते. म्हणूनच जगात सगळीकडेच सामान्य माणसांना एकुणातच श्रीमंताच्या यशाबद्दल नाराजी असण्यापेक्षाही त्यांच्याबद्दल एक उत्सुक आकर्षण असते, त्यांच्या महत्त्वाकांक्षा आणि आकांक्षांबद्दल सहानुभूती असते. पण या प्रकरणी दिसणाऱ्या श्रीमंतीचे एक वैशिष्ट्य आहे. सहसा, श्रीमंतांकडून समाजाला वेगवेगळ्या गोष्टी मिळतात. कुणाच्या श्रीमंतीमधून त्यांच्या वलयाचे दर्शन होते. कुणाच्या श्रीमंतीमधून उद्योग उभे राहतात तर कुणाच्या श्रीमंतीमधून बाहुबळाचे दर्शन होते. या विशिष्ठ प्रकरणात, या सगळ्याच घटकांचे एकत्रीकरण आहे आणि त्यामुळे ती आणखी रंजक आहे. स्वत:बद्दल फारसे न व्यक्त होण्याच्या भारतीय उद्योगाच्या पारंपरिक भूमिकेत तिच्यामुळे बदल होताना दिसतो आहे. जणू चित्रपटांच्या क्षेत्रातील सर्वात मोठ्या निर्मात्यांनी स्वत:वरच चित्रपट बनवला आहे. मनोरंजन उद्योगाचे सर्वात शक्तिशाली नियंत्रक स्वत:च मनोरंजनाचा भाग बनले आहेत आणि बातम्यांचे मालक बातमी बनले आहेत.यापैकी काही गोष्टी संस्कृतीतील व्यापक बदलांमुळे घडलेल्या असू शकतात. आजकाल समाज माध्यमांवर तुम्ही तुमचे अस्तित्व अधोरेखित केलेले नसेल तर कदाचित प्रत्यक्षातही तुम्ही कदाचित अस्तित्वात नाही, असेच मानले जाते. आपल्या व्यक्तिमत्वाच्या आत्यंतिक खासगी, वैयक्तिक पैलूचे देखील सार्वजनिक प्रकटीकरण करणे, त्याबद्दल इतरांनी प्रतिक्रिया व्यक्त करणे आजकाल आवश्यक होऊन बसले आहे. मित्र एकमेकांबद्दल काय विचार करतात, पालक आपल्या मुलांबद्दल काय विचार करतात, एखाद्या नववधूबद्दल तिची सासरची मंडळी काय विचार करतात, आपले कुणावर प्रेम आहे (किंवा कुणाबद्दल आपल्याला द्वेष वाटतो आहे) हे सगळे त्या त्या संबंधित व्यक्तीपर्यंत थेट पोहोचवण्यापेक्षाही समोर प्रत्यक्ष न दिसणाऱ्या, अमूर्त अशा प्रेक्षकांना उद्देशून सार्वजनिक पातळीवर सांगितले जाते. परोपकार, धार्मिकता, भक्ती, करुणा, प्रेम, मैत्री, कौटुंबिक बंध यासारखे सद्गुण आणि भावना सार्वजनिक पातळीवर व्यक्त करणे एके काळी अप्रासंगिक मानले जायचे. आता त्या सार्वजनिक पातळीवर व्यक्त करणे हेच सगळ्यात महत्त्वाचे वैशिष्ट्य मानले जाते. समाज माध्यमांवर लोक ज्या पद्धतीने स्वतला व्यक्त करतात, त्यामुळे अनेकदा तणाव निर्माण करणारेही मानले जाते. तिथे दोन्ही गोष्टी आहेत, एक म्हणजे स्वत:ला आदर्श मानणे, स्वत:चे आदर्शीकरण करणे, स्वत:ला सर्वात आदर्श पद्धतीने सादर करणे आणि दुसरे म्हणजे हा मी असा आहे, असे म्हणत स्वत:ला प्रामाणिकपणे सादर करणे. लोकमत या दोन्ही एकत्र करण्याचा प्रयत्न करते, तेव्हा त्याच्या परिणामी आपल्या काळातील एक परिपूर्ण श्रीमंती मूर्त स्वरूपात आपल्यासमोर उभी ठाकते. उदाहरणार्थ अंबानींच्या घरातील विवाहपूर्व समारंभ.पण याला एक सखोल राजकीय पैलूही आहे. डम स्मिथसारख्या अर्थतज्ज्ञाला मत्सर या भावनेपेक्षाही श्रीमंतांचे राजकीय सामर्थ्य हे अधिक चिंताजनक वाटते. श्रीमंत, लोक त्यांना हव्या त्या सगळ्या गोष्टींचा उपभोग घेत असतानाही, इतरांना त्याचा पत्ताही लागत नाही. श्रीमंतांना कोणत्याही प्रकारच्या सत्तेला थारा देण्याची गरज नसते, असेच दाखवले जाते. भारतात कुठेही श्रीमंतीचे विकृत प्रदर्शन घडवले जात असते. पण आता मात्र श्रीमंतीचे प्रदर्शन करण्यात काहीच गैर नाही, हे जे उघडपणे स्वीकारले जात आहे, ते लक्षणीय आणि नोंद घेण्याजोगे आहे. असे काय बदलले आहे की त्यांना आपल्या ताकदीचे असे प्रदर्शन घडवले असेल? त्यासाठी तीन गोष्टी दिसतात. जे भांडवल किंवा पैसा देतात, तेच सत्ताही देतात अशी एक जुनी म्हण आहे. पण आता फक्त भांडवली व्यवस्थाच बदललेली नाही तर, तर मोठे भांडवल उभे करण्याची क्षमता असणाऱ्यांच्या भोवतीची मिथक निर्मितीही बदलली आहे. अंबानी (किंवा अगदी अदानीदेखील) जे करू शकतात आणि देऊ शकतात ते इतर कोणतीही यंत्रणा वा संस्था देऊ वा करू शकत नाही, अशी समजून रचण्याचे काम सुरू आहे. तुम्हाला मोठ्या रिफायनरीज हव्या आहेत, वेगाने बंदरे बांधून हवी आहेत, स्वस्त दरात टेलिकॉम सुविधा हव्या आहेत, जागतिक पातळीवरचे विजेते हेवे आहेत तर त्यासाठी तुमच्याकडे एकच गोष्ट हवी, ती म्हणजे मोठे भांडवल. नियामकांतील फेरफारामुळेच हे शक्य होणार आहे. असे थेट न म्हणता थोडे सौम्यपणे म्हणायला हवे आहे का? ठीक आहे मग आपण असे म्हणूया की कोणत्याही गोष्टीच्या परिणामाची भव्यता पहा. वेगळ्या पद्धतीने म्हणायचे तर असे प्रसंग तुमच्या क्षमता ठळकपणे दाखवून देतात. दुसरे, अंबानींच्या बाबतीत सांगायचे तर त्यांना कतारच्या अमीरापासून रिहानापर्यंत सगळ्यांचेच जगापुढे प्रदर्शन मांडायचे आहे. भारत जगातला श्रीमंत देश नसला म्हणून काय झाले, जगातील सर्वात श्रीमंत व्यक्ती तर भारतात आहे या ना त्या मार्गाने जग भारतापुढे झुकते आहे ना तो (देश) कशात तरी नंबर वन गणला जातो आहे ना. त्यातून आपल्या देशाची ताकदच दिसते आहे ना. तिसरा मुद्दा म्हणजे हिंदू राष्ट्रवाद आणि भारतीय भांडवल यांच्यातील परिपूर्ण वैचारिक जुळणी. त्यासाठी तुमच्याकडे भांडवल असावे लागते, ते दिसावे लागते; त्याला आपल्या कार्याबद्दल असलेली निष्ठा जाहीरपणे दाखवावी लागते. या बदल्यात, भांडवलाची एक राष्ट्रवादी प्रकल्प म्हणून पुनर्रचना केली जाऊ शकते, आणि त्यासाठी उत्तम संस्कारी भांडवलदार कुटुंबापेक्षा चांगले साधन असूच सकत नाही. या तिन्ही गोष्टी एकत्र येऊन एका परिपूर्ण राष्ट्रवादाची निर्मिती होते. ही अंबानी मंडळी ही मोठी गोड, छान, विचारी मंडळी आहेत, तिथे जमलेल्या सगळ्या लोकांच्या मनात अंबानी मंडळींबद्दल निस्सीम वैयक्तिक प्रेम होते, यातही काहीच शंका नाही. पण सार्वजनिक पातळीवर कोणीही कोणालाही आणू शकतो, आणि त्यांनी ज्याला आणले आहे तो कितीही ताकदवान असला तरी, त्याचे प्रदर्शन मांडून ते त्याला नाचायला लावू शकतात, हे एक प्रकारे शक्तीप्रदर्शन घडवण्यासारखेच आहे. आपल्या एकट्याकडेच सगळी ताकद एकवटलेली असायला पाहिजे, असे एखाद्याला का वाटते, ते यातूनच स्पष्ट होते. ज्याच्याकडे असे बाहुबळ असते तो बाकी सगळ्यांना त्यांची जागा दाखवून देऊ शकतो. भलेही तुम्ही जगातले महान तारेतारका असाल किंवा देशातली प्रमुख व्यक्ती असाल, पण तरीही अंबानींनी बोलावले तर तुम्हाला तिथे जावेच लागते आणि आपण गेलो होतो याचे प्रदर्शनही करावे लागते.

# भारतातील दीर्घ काळ चाललेला संघर्ष. काळाराम मंदिर सत्याग्रह

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मानवी मूल्यांसाठी दीर्घकाळ संघर्ष करीत, येथील जातीव्यवस्था, त्यातील शूद्रांना मानवतेचे हक्क नाकारणाऱ्या प्रथा, परंपरा, रुढी विरुद्ध तहहयात लढा दिला. त्याचाच एक भाग नाशिक मधीलकाळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह आहे. हा लढा पाच वर्षे, अकरा महिने निरंतर सुरू असल्यामुळे आंदोलनातील मैलाचा दगड ठरला आहे. स्वधर्मात देवदर्शनासाठी इतका सातत्यपूर्ण व निरंतर दीर्घकाळ चाललेल लढा जगात कुठेही झाल्याचे ऐकवित नाही. त्याचे नेतृत्व कर्मवीर दादासाहेब गायकवाड ह्यांच्यावर सोपवले होते.त्यांनी अतिशय निष्ठेने, कष्टपूर्वक ही कामगिरी यशस्वी केली. ह्या सत्याग्रहातील त्यांच्या कामगिरीमुळे त्यांचे नेतृत्व झळाळून लोकमान्य झाले.

आपले प्रश्न वर्णवादी व्यवस्थेमुळे इतके जटिल झाले आहेत की, ते मंदिर प्रवेशाने सुटणार नाहीत. आपण राजकिय, धार्मिक, सामाजिक आणि शिक्षणासाठी संघर्ष करीत आहोत. आपण हिंदू धर्मीय असून देखील स्वधर्मातील उच्चवर्गीयांनी आपल्याला मानवी हक्कांपासून दूर ठेवले. त्यामुळे आपल्या वाट्याला कायम दरिद्री, गरिबी, लाचारी आणि धार्मिक अंधश्रद्धा आली. यास्तव आपली प्रगती खुंटली. म्हणुन त्यांच्याकडून आपल्याला मानवी हक्क मिळतात का? आपल्याला माणूस म्हणुन ते स्विकारतात की नाही? ह्याचा उलगडा या सत्याग्रहाच्या माध्यमातुन होणार आहे. असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे म्हणने होते.

मंदिर प्रवेशावर सनातनी लोकांनी प्रश्न केला की, तुमची रामावर भक्ती असेल तर मंदिरातच प्रवेश का? त्यावर बाबासाहेबांनी थेट उत्तर दिले की, देवळात प्रत्यक्ष पूजा करता यावी. यासाठी हा सत्याग्रह नाही. आम्हाला सिद्ध करायचे आहे की, आमच्या प्रवेशाने मंदिर भ्रष्ट होत नाही. तसेच स्पर्श केल्याने मूर्तीचे पावित्र्य कमी होत नाही. हिंदुत्व जितकी स्पृश्य लोकांची मालमत्ता आहे, तितकीच ती अस्पृश्यांची देखील आहे. या हिंदुत्वाची प्राण प्रतिष्ठा जितकी वशीष्ठासारख्या ब्राह्मणाने केली, कृष्णासारख्या क्षत्रीयांनी ,तुकारामा सारख्या वैश्याने केली. तितकीच वाल्मिकी, रोहिदास ह्या अस्पृश्यांनी देखील केली आहे. हे विसरून कसे चालेल ? हिंदुत्वाच्या रक्षणासाठी अस्पृश्यांनी माणुसकी खर्ची घातली आहे. मंदिरे जितकी स्पृश्याची, तितकीच अस्पृश्यांची देखील आहेत.

हा लढा मंदिर प्रवेशापूरता मर्यादित नाही. तर सनातनी लोकांनी आमच्यावर लादलेल्या जाचक परंपरा, रुढी पासून मुक्ती मिळवण्यासाठी आहे.

ऑक्टोबर १९२९ मध्ये विचार विनिमय होऊन केशव नारायण वर्पे कर ह्यांच्या अध्यक्षतेखाली सत्याग्रह समिती स्थापन करण्यात आली. व तिच्या सरचिटणीस पदी भाऊराव गायकवाड ह्यांची निवड झाली. त्यांनी मंदिर प्रशासनास मंदिर प्रवेशाची माहिती देण्यासाठी आगाऊ नोटिस दिली. परंतु त्याची दखल घेतली नाही. पण त्यांनी प्रशासनाकडे पोलीस बंदोबस्ताची मागणी केली. २ मार्च १९३० ला नाशिक येथे सभा होऊन १५००० लोकांची मिरवणूक डॉ. बाबासाहेब आंबेडकर व कर्मवीर भाऊराव गायकवाड ह्यांच्या नेतृत्वाखाली मंदिर प्रवेशाकरिता निघाली. परंतु त्यांना पूर्व कल्पना असल्यामुळे मंदिराचे चारही दरवाजे बंद ठेवले. त्यामुळे मिरवणूक गोदावरीक्ष घाटावर येऊन त्याचे सभेत रूपांतर झाले. तेव्हा प्रत्येक दरवाज्यासमोर १२५ पुरुष व २५ महिला ह्यांचे चार गट करण्यात येऊन ०३/०३/१९३० ला, कचरू साळवे, पतितपावन दास, पांडुरंग राजभोज,आणि शंकरदास नारायणदास ह्यांच्या नेतृत्वाखाली चार दिशेच्या दरवाजा समोर सत्याग्रहाला सुरुवात झाली. सत्याग्रह शांततेत आणि सनदशीर मार्गाने झाला पाहिजे. असा बाबासाहेबांचा आदेश असल्यामुळे सर्व शांततेत सुरू झाले. त्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर व भाऊराव गायकवाड हे गुरू, शिष्य बारीक नजर ठेऊन व्यवस्था पाहत होते. त्यावेळी हजारो बंदूकधारी पोलीस बंदोबस्तासाठी तैनात होते.

हा सत्याग्रह एक महिना निरंतर सुरू होता. तेव्हा ९ एप्रिल १९३० ला राम नवमी उत्सव आला.

तत्पूर्वी सनातनी मंदिर प्रशासनाशी तडजोड होऊन अस्पृश्यांसह सर्वांनी रथ ओढण्याचे एकमताने ठरले. त्याप्रमाणे रामनवमीला डॉ. बाबासाहेब आंबेडकर, भाऊराव गायकवाड कार्यकर्त्यांसह आले असतांना, त्यांनी रथाला हात लावण्यापूर्वी, सनातन्यानी हुलकावणी देत रथ दुसर्याच दिशेला पळवला. त्यामुळे पाठलाग होऊन रेटारेटी झाली. नंतर मारामारी सुरू झाली. हे सर्व पूर्वनियोजित असल्यामुळे सत्याग्रहींवर तुफान दगडांचा मारा सुरू होऊन त्यात अनेक लोक जखमी झाले.तर काही रक्तबंबाळ झाले. ह्या दगडफेकीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर देखील किरकोळ जखमी झाले. त्यामुळे त्यांना अधिक मार लागु नयेत म्हणुन डोक्यावर छत्री धरून त्यांची काळजी घेतली गेली. तेव्हढ्यात पोलिसांचे कडे तोडून भास्कर कद्रे मंदिरात घुसला. त्यामुळे सनातनी खवळले. आमचे मंदिर बाटवले म्हणुन त्याला अमानुषपणे मारहाण करण्यात आली. त्यामुळे तो रक्तबंबाळ होऊन बेशुद्ध पडला. नंतर त्याला दवाखान्यात दाखल केल्यानंतर त्याचे निधन झाले. ह्या प्रकारानंतर दलितांच्या मुलांची शाळा बंद झाली. त्यांना रस्त्यावर चालण्यास मज्ञाव करण्यात आला. एवढेच नाही तर दुकानातील वस्तू देण्याचे बंद करून त्यांची चौफेर कोंडी करण्यात आली. तुम्ही माजले आहात अशी दमदाटी सुरू झाली. ह्या ही परिस्थितीत ही कर्मवीर दादासाहेब गायकवाड ह्यांनी सत्याग्रहात खंड पडू न देता, ते निरंतर सुरूच ठेवले.

ही सर्व परिस्थिती डॉ. बाबासाहेबांनी बॉम्बे प्रांताचे गव्हर्नर फ्रेडरीक साईक्स ह्यांना कळविली.

त्यामुळे गव्हर्नरांनी परिस्थिती अधिक बिघडू नये म्हणुन आयुक्त घोषाल ह्यांना चौकशीसाठी तसेच प्रत्यक्ष बंदोबस्ताची पाहणी करण्यासाठी पाठविले. त्यांनी बाबांची भेट घेऊन परिस्थिती समजून घेतली. तेव्हा बाबा म्हणाले की, मी माझ्या लोकांना हक्क मिळवून देण्यासाठी लढा उभारला आहे. त्यात सन्माननीय तडजोड होत असेल तर मी सत्याग्रह स्थगित करण्यास तयार आहे. तसेच आयुक्तांनी सत्याग्रहीची भेट घेऊन चर्चा केली. त्याचा अहवाल गव्हर्नर साहेबांना सादर केला. नंतरच्या काळात बाबांनी ह्यात तोडगा निघावा म्हणुन खूप पाठपुरावा केला. पण तोडगा निघाला नाही. पुढे दीर्घकाळ कर्मवीर दादासाहेब गायकवाड ह्यांच्या नेतृत्वाखाली सत्याग्रह निरंतर शांततामय मार्गाने सुरू होता.

संपूर्ण उच्चवर्गीय समाज विरोधात असताना सतत पाच वर्षे अकरा महिने सत्याग्रह अखंडित चालविणे. ही अत्यंत खडतर गोष्ट होती. पण ते बाबांचे निष्ठावान अनुयायी होते. त्यांनी सर्व अडचणींवर मात करीत आणि अडथळे पार करून सत्याग्रहाची ज्वाला धगधगत ठेवली.

दरम्यानच्या काळात ०४/०२/१९३३ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी येरवडा जेलमध्ये महात्मा गांधींची भेट घेतली. त्यावेळी एस. एन. शिवतरकर, डोळस, उपश्याम,कौले, घोरपडे आणि केशवराव जेधे उपस्थित होते. तेव्हा काळाराम मंदिर सत्याग्रहाचा विषय काढताच गांधीजींनी डॉ. सुब्बरायन, आणि रंगा नायर ह्यांच्या विधेयकाला पाठींबा देण्याची विनंती केली. त्यावेळी बाबा देखील मुंबई राज्य विधान परिषदेचे सदस्य होते. त्यावर बाबासाहेबांनी स्पष्ट नकार देत सांगितले की, त्यांनी सार्वमताने फक्त मंदिर प्रवेशास अनुकूलता दर्शविली आहे. परंतु पूजा करण्याचा काहीही अधिकार असणार नाही. असे सूचित केले आहे.शोषित वर्ग फक्त मंदिर प्रवेशाने समाधानी होणार नाही. या वर्गाचा नैतिक आणि सामाजिक उत्कर्ष होणे आवश्यक आहे. त्यासाठी शिक्षण मिळणे निकडीचे आहे.त्या अनुषंगाने जाती व्यवस्थेचे समूळ उच्चाटन होणे आवश्यक आहे. त्याशिवाय अस्पृश्यांचा उत्कर्ष होणार नाही.

सामाजिक बदलाची प्रक्रिया हळूहळू होत असते. ह्याची बाबांना जाणीव असल्यामुळे, ते अस्पृश्यांना हक्क मिळावेत म्हणुन वेगवेगळ्या मार्गाने लढत राहिले. मंदिर प्रवेश हा त्याच लढ्याचा एक भाग आहे. ही एक क्रांतिकारी घटना असून, त्याने जाती व्यवस्थेच्या बुरुजाला सुरुंग लावण्याचे काम केले. हा लढा प्रतिकात्मक होता. जो समाज जाती व्यवस्थेचा बळी पडला आहे, त्याला या अंधारातून बाहेर काढण्यासाठी सत्ताधारी इंग्रजांना देखील जाणीव व्हावी यासाठीचे पाउल होते.

ह्या सत्याग्रहात कुसुमाग्रज देखील सामील झाले होते. त्यांच्या क्रांतिकारी कवितांची सुरुवात ह्या लढ्यातून झाली.

इतके दीर्घकालीन आंदोलन करून देखील त्याचा परिणाम कुणावर परिणाम झाला नाही. म्हणुन बाबासाहेबांनी कंटाळून ३ मार्च १९३४ रोजी भाऊराव गायकवाड ह्याना पत्र लिहून कळविले की, ह्यापेक्षा जास्त दिवस सत्याग्रह सुरू ठेऊन शक्ति वाया घालवण्यापेक्षा राजकिय हक्क आणि शिक्षणाची सोय व्हावी यासाठी वापरावी. म्हणुन सत्याग्रह स्थगित करावा.

ह्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९३५ साली येवला येथे पूर्ण विचाराअंती धर्मांतराची घोषणा केली.

मनाला खंत वाटते की, इतका दीर्घकाळ चाललेला आणि अत्यंत खडतर काळात ज्या भीम अनुयायांनी आपल्या जिवाची पर्वा न करता हा लढा निरंतर धगधगत ठेवला त्यांच्या स्मरणार्थ उचित स्मारक होणे अपेक्षित असतांना ते का होऊ शकले नाही. हा प्रश्न पडल्याशिवाय राहत नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मानवमुक्तीच्या लढ्यामधील अत्यंत महत्त्वाचे महाड, येवला, दीक्षाभूमि येथे उचित स्मारके उभारली गेली. आज ती आंबेडकरी जनतेची तीर्थस्थाने झाली आहेत. मग येथे कोणती अडचण आहे? मनाला अशी ही शंका चाटून जाते की, आंबेडकरी समाजात अनेक गट, तट आहेत आणि ते कायम एकमेकांवर कुरघोडी करण्याच्या प्रयत्नात दिसतात. ह्या बाबतीत ही असे तर नसेल ना? जर असे असेल तर ती अतिशय निषेधार्ह गोष्ट आहे. त्यामुळे मला असे वाटते की, जर एखादा समूह, गट, संघटना स्मारकासाठी प्रयत्नशील असेल तर त्यांना सगळ्यांनी एकदिलाने सहकार्य करून ते पूर्णत्वास नेण्यासाठी हातभार लावणे हेच खरे सत्याग्रहींना अभिवादन ठरेल.

सर्व सत्याग्रहींना विनम्र अभिवादन.!

जयभीम. अरुण निकम.
९३२३२४९४८७.
मुंबई संदर्भ. १ ) काळाराम मंदिर विकिपीडिया
२ ) धनंजय कीर. ३ )साप्ताहिक विवेक, रवी गोळे.
४ ) प्रशांत भरविरकर . महाराष्ट्र टाइम्स, नाशिक पुरवणी. एप्रिल २०१८.

# १० पैकी ६ रुग्णांना बहिरेपणाचे विकार; सतत हेडफोनचा वापर, डी.जे.च्या आवाजाचा दुष्परिणाम

जिल्हा रुग्णालय व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात दर महिन्याला होणाऱ्या तपासणीत धक्कादायक चित्र आढळून आले आहे. दहा रूग्णांमागे किमान सहा रुग्ण कानाच्या विकाराने ग्रस्त आहे. युवकांनी हेडफोनचा वापर न टाळल्यास लवकरच त्यांना पन्नास ते साठ टक्के बहिरे होण्याचा धोका आहे. अशी माहिती जिल्हा रुग्णालयातील राष्ट्रीय कर्णबधिर प्रतिबंध नियंत्रण कार्यक्रमाच्या ऑडिओ लॉजिस्ट शेख मुनजजा यांनी 'सकाळ' ला दिली.काल रविवारी (ता.३) जागतिक श्रवण दिन साजरा झाला. त्यापार्श्वभूमीवर त्यांनी 'सकाळ'शी संवाद साधला. संगणकाच्या, धकाधकीच्या जीवनात सोशल मिडीयामुळे बहुतांश सर्वंच जणांकडे अन्ड्राइड मोबाईल असतो. अनेक जण हेडफोन लावून यू ट्यूबसह विविध प्रकारचे संगीत ऐकतात. दिवसभरातील किमान पाच ते सहा तास युवा पिढी हेडफोन लावते.सोबतच लग्न समारंभात डी.जे.लावून नाचण्याचा प्रकार प्रत्येक लग्नात असतो. डी.जे.चा होणारा मोठा आवाज, कानाला सतत लागलेला हेडफोन यामुळे युवकांमध्ये कानाच्या विकाराचे प्रमाण वाढले आहे. त्या म्हणाल्या, दर आठवड्याला श्रवण दोष किती कमी आहे याबाबत तपासण्या करून रुग्णांना प्रमाणपत्र देतो. त्यात युवक, वृध्द व बालकांचा सामावेश असतो.काहीसे अस्पष्ट ऐकायला येते. ही सार्वत्रिक तक्रार असते.मोबाईलवरील युटयूबची गाणी, हेडफोन लावून ऐकतात. रोजचे पाच



ते सात तास. डी.जे.च्या मोठ्या आवाजावर किती वेळ नाचतात. लहानपासून युवक, वृद्धांना डी.जे.चा त्रास होतो. हृदयावरही परिणाम होतो. डीजे लावून नाचणे, कानात हेडफोन लावून गाणी ऐकण्याची फॅशन करताना आरोग्याची हेळसांड करतो.कानाच्या पडद्यावर वेळीच उपचार घेतले नाहीतर भविष्यात बहिरे पणाचा धोका नक्कीच असतो. जागतिक आरोग्य संघटनेची श्रवणविषयक काळजीला प्रोत्साहन देण्यासाठी यावर्षी 'मानसिकता बदलत आहे: चला कान आणि श्रवण काळजी सर्वांसाठी एक वास्तविकता बनवूया ही संकल्पना घेत, महत्त्व अधोरेखित करते. जन्मपूर्व आणि प्रसवपूर्व कालावधीपासून वृद्धापकाळापर्यंत संपूर्ण आयुष्यभर श्रवणशक्ती कमी होण्यापासून बचाव करणे आवश्यक आहे. मुलांमध्ये, श्रवण कमी होण्याचे जवळपास ६० टक्के टाळता येऊ शकतात.हे आहेत उपाय डीजे व लाऊड स्पीकर च्या मोठ्या आवाजाच्या संपर्कात घट करण्यासाठी सुरक्षित ऐकण्याच्या धोरण करणे, ओटोटॉक्सिक ऐकण्याचे नुकसान टाळण्यासाठी औषधांचा तर्कसंगत वापर करणे, हेडफोन किंवा इअरबड वापरताना, आवाज वाजवी पातळीवर ठवणे, जर तुम्ही गोंगाटाच्या वातावरणात काम करत असाल किंवा तुमच्या श्रवणाबद्दल चिंता असेल मूल्यमापनासाठी ऑडिओलॉजिस्टला भेट द्या. मधुमेह आणि हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी रोगांसारख्या आरोग्याच्या काही परिस्थितींमुळे श्रवणशक्ती कमी होऊ शकते, योग्य आहार, व्यायाम आणि औषधोपचाराद्वारे हे आजार नियमित ठेवणे. कान स्वच्छ करण्यासाठी इयर बड्र्सचा वापर टाळणे, कारण यामुळे कानाच्या कालव्यात खोलवर जाऊ शकते आणि तुमच्या कानाच्या पडद्याचे संभाव्य नुकसान होऊ शकते. अस्वच्छ पाण्यात पोहणे टाळावे. वेळेवर कानाची ऐकण्याची तपासणी करणे

# 'या' योगासनांमुळे वाढेल तुमच्या शरीराचा स्टॅमिना, दम लागणार नाही आणि थकवा ही जाणवणार नाही

जर आपल्या शरीरात योग्य स्टॅमिना असेल, तर आपले शारिरीक आणि मानसिक आरोग्य उत्तम राहण्यास मदत होते. एवढचं नव्हे तर शारिरीक आणि मानसिक ऊर्जेचे वर्णन करण्यासाठी हा स्टॅमिना शब्द खास करून वापरला जातो. शरीरात भरपूर स्टॅमिना असेल तर, आपण दीर्घकाळापर्यंत काम करू शकतो.मात्र, आजकाल अनेकांच्या शरीरात स्टॅमिना कमी जाणवतो. त्यामुळे, शरीर लवकर थकते आणि दम लागतो. शिवाय, श्वास घेण्यास ही अडचणी येतात. ही समस्या दूर करण्यासाठी तुम्ही नियमितपणे व्यायाम करणे आणि संतुलित आहार घेणे फायद्याचे आहे. यासोबतच पुरेशी झोप घेणे गरजेचे आहे.जर तुम्हाला शरीराचा स्टॅमिना वाढवायचा असेल, तर तुम्ही तुमच्या जीवनशैलीत काही आरोग्यादायी बदल करणे आवश्यक आहे. यासाठी तुम्ही काही योगासनांची मदत घेऊ शकता. या योगासनांचा नियमितपणे सराव केल्याने तुमच्या शरीराची ताकद वाढते आणि स्टॅमिना ही वाढतो. ज्यामुळे, थकवा जाणवत नाही आणि दम लागत नाही. कोणती आहेत ही योगासने? चला तर मग जाणून घेऊयात. धनुरासन धनुरासन हे योगासन आपल्या शारिरीक आणि मानसिक आरोग्यासाठी अतिशय फायदेशीर आहे. या योगासनाचा सराव केल्याने रक्तप्रवाह सुधारतो आणि आपली रोगप्रतिकारक शक्ती वाढण्यास मदत होते. या योगासनामुळे पचनसंस्था निरोगी राहते आणि कंबर, छातीच्या समस्यांपासून आराम मिळतो. शिवाय, स्टॅमिना देखील सुधारतो.हे योगासन करण्यासाठी सर्वात आधी योगा मॅटवर पोटावर झोपा. आता दोन्ही पायांचे घोटे तुमच्या दोन्ही हातांनी पकडण्याचा प्रयत्न करा. आता दोन्ही हातांनी पायांची बोटे पकडून दीर्घ श्वास घ्या. त्यानंतर, तुमचे पाय वरच्या दिशेने खेचा. आता तुम्हाला शरीरात ताण जाणवेल. काही सेकंद या स्थितीमध्ये राहिल्यानंतर सामान्य स्थितीमध्ये परत या. उष्ट्रासन या योगासनाचा सराव केल्याने आपल्या शरीराचा स्टॅमिना वाढण्यास मदत होते. यासोबतच आपले शरीर लवचिक होते. यासोबतच थकवा दूर होतो आणि डोळ्यांची दृष्टी सुधारते. इतकेच नव्हे तर पाठदुखीपासून आराम मिळतो आणि मानसिक आरोग्य देखील चांगले राहते. मात्र, हे योगासन करताना योग अभ्यासकाची मदत घ्या किंवा योगा तज्ज्ञाच्या देखरेखीखाली हे योगासन करा. या योगासनाचा सराव करण्यासाठी सर्वात आधी योगा मॅटवर गुडघ्यावर बसा. त्यानंतर, श्वास घेताना पाठीच्या मणक्याच्या खालचा भाग हा पुढच्या दिशेने नेण्याचा प्रयत्न करा. या दरम्यान, तुमच्या नाभीवर पूर्ण दाब जाणवायला हवा. त्यानंतर, पाठीमागे वाकताना तुमची पाठ वाकवा आणि मान सैल सोडा.

# २ लाख २५ हजार रुपयाच्या सोन्याचे ९० ग्राम वजनाचे दागिनेच्या मुद्देमालासह अटक.घरफोडीचे ३ गुन्हे, व पोलिसावर चाकू हल्ला केल्याचा एक गुन्हा उघड. स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई.

लातूर :- २ लाख २५ हजार रुपयाच्या सोन्याचे ९० ग्राम वजनाचे दागिनेच्या मुद्देमालासह अटक. घरफोडीचे ३ गुन्हे, व पोलिसावर चाकू हल्ला केल्याचा एक गुन्हा उघड. स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई. याबाबत थोडक्यात माहिती की, लातूर जिल्ह्यातील वेग-वेगळ्या पोलीस ठाणे हद्दी मध्ये रात्रीच्यावेळी राहते घराचा कडी-कोंडा तोडून घरफोडीच्या घटना घडल्या होत्या. त्यावरून जिल्ह्यातील वेगवेगळ्या पोलीस स्टेशनला घरफोडीचे गुन्हे दाखल करण्यात आले होते.

सदरचे गुन्हे उघडकीस आणणे बाबत पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी आदेशित केले होते. त्यावरून पोलीस अधीक्षक सोमय मुंडे ,अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे, यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी व अमलदारांचे पथके तयार करून त्यांना सखोल मार्गदर्शन व सूचना देण्यात आल्या होत्या.

सदर पथकाकडून गुन्ह्या संदर्भात बारकाईने तपास सुरू असताना मोठ्या प्रमाणात बातमीदार नेमून तसेच तांत्रिक माहितीचे विश्लेषण करून अज्ञात आरोपींचा शोध घेण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेण्यात येत होते.

वरिष्ठांचे मार्गदर्शनात सदरच्या पथकांनी केलेल्या परिश्रमामुळे पथकांना गुप्त बातमीदाराकडून घरफोडीचे गुन्हे करणाऱ्या आरोपींची माहिती मिळाली.

घरफोडीतील व पोलिसांवर चाकू हल्ला केलेला कुख्यात गुन्हेगार त्याने चोरलेला सोन्याचा मुद्देमाल विकण्यासाठी निलंगा तालुक्यातील हाडगा ते निलंगा जाणाऱ्या रोडच्या परिसरात फिरत आहे अशी माहिती मिळाली. सदर माहितीची खातरजमा करून सदरचे पथक तात्काळ रवाना करण्यात आले.

सदर पथकाने निलंगा येथे पोहोचून हाडगा ते निलंगा जाणाऱ्या परिसरात फिरत असलेल्या संशयित आरोपीला ताब्यात घेतले.

सदर पथकांनी अतिशय कुशलतेने सापळा लावून घरफोडीच्या गुन्ह्यातील व पोलिसांवर चाकू हल्ला केलेला कुख्यात आरोपीला दिनांक ०५/०३/२०२४ रोजी ताब्यात घेऊन त्याच्याकडे विचारपूस केली असता त्याने त्याचे नाव नामदेव किशन भोसले,वय २४ वर्ष, राहणार मंग्याळतांडा, तालुका मुखेड जिल्हा नांदेड असे असल्याचे सांगितले.

त्याच्याकडे असलेल्या पिशवीची झडती घेतली असता त्यामध्ये




सोन्याचे वेगवेगळे दागिने दिसून आले त्याबाबत त्याच्याकडे विचारले तेव्हा त्याने त्याच्या इतर आणखीन दोन साथीदारासह मिळून लातूर जिल्ह्यातील वेगवेगळ्या पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये घरफोडीचे गुन्हे केल्याचे व त्या गुन्ह्या मध्ये चोरलेला, त्याच्या वाट्याला आलेले सोन्याचा दागिन्याचा मुद्देमाल व रोख रक्कम असल्याचे कबूल केले.

लातूर जिल्ह्यात घडलेल्या घोरफोडीच्या गुन्ह्याच्या अभिलेखाची पाहणी केली असता नमूद आरोपीनी पोलीस ठाणे कासार शिरशी,औसा, किल्लारी येथील एकूण तीन घरफोडी चे गुन्हे दाखल असल्याचे निष्पन्न झाले.

तसेच पोलीस ठाणे निलंगा येथे चोरी करण्याच्या प्रयत्नात असताना निलंगा पोलिसांनी नमूद आरोपींना ताब्यात घेत असताना पोलिसावर चाकू हल्ला करून पळून गेले होते. त्यावरून पोलीस ठाणे निलंगा येथे भादवि कलम ३०७, ३५३, ३३२ ५०६ व ३४ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदरचे गुन्हेगार हे दिवसा ऊस तोडीचा काम करत व रात्री रेकी करून घरफोडीचे गुन्हे करत असल्याचे निष्पन्न झाले आहे.

नमूद आरोपीस त्याने इतर साथीदाराच्या सोबत चोरलेल्या ९० ग्राम सोन्याचे दागिने ०२ लाख २५ हजार रुपयाच्या मुद्देमालासह पुढील कारवाई करिता पोलीस ठाणे कासारशिरशी यांचे ताब्यात देण्यात आले आहे. असून त्याच्या सोबत असलेल्या फरार आरोपी साथीदाराचा शोध सुरू आहे.

वरिष्ठांचे मार्गदर्शनात पोलीस पथकांनी अतिशय उत्कृष्टरित्या तपास करून दिवसा ऊस तोडीचे काम करून रात्री घरफोडी करणाऱ्या आरोपीच्या मुसक्या आवळल्या असून त्यांच्याकडून चोरीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे, मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांच्या नेतृत्वातील पथकामधील सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण राठोड, पोलीस अमलदार माधव बिलापट्टे, नवनाथ हासबे, मोहन सुरवसे, राजेश कंचे, रामभाऊ मस्के, तुराब पठाण, जमीर शेख, संतोष खांडेकर, नकुल पाटील यांनी केली आहे.

# मासिक पाळीत खूप पोट दुखतं? मग करा हे उपाय, पोटदुखी होईल कमी...

मासिक पाळीदरम्यान पोट, ओटीपोट आणि कंबरदुखीच्या त्रासाचा सामना प्रत्येक महिलेला करावा लागतो. अनेक वेळा काही महिलांना मासिक पाळीत जास्त वेदना सहन कराव्या लागतात. पीरियड्समध्ये प्रत्येक महिला कित्येक प्रकारच्या शारीरिक आणि मानसिक समस्यांमुळे त्रस्त असते. पण यापैकी सर्वात सामान्य समस्या म्हणजे ओटीपोटामध्ये असह्य अशा वेदना होणे. मासिक पाळीचा त्रास कमी करण्यासाठी काही गोष्टींची काळजी घेतल्यास त्रास कमी होतो. अशा परिस्थितीत, मासिक पाळीच्या वेदना कमी करण्यासाठी, तुम्ही घरगुती उपचारांची मदत घ्यावी. मात्र, दर महिन्याला या दिवसांत तुम्हाला तीव्र वेदना होत असतील तर त्याकडे दुर्लक्ष करू नये. तज्ज्ञांच्या मते, मासिक पाळीच्या वेदना कमी करण्यासाठी हे घरगुती उपाय प्रभावी आहेत.गरम पाण्याचा शेक हा तर सगळ्यात उपयुक्त उपाय आहे. गरम पाणीचा शेक हा एखाद्या पेनकिलर गोळीचं काम करतो. या दिवसात ओटीपोट आणि कंबर प्रचंड दुखत असते. यामुळे स्नायूंना आराम मिळेल.हर्बल चहा वेदना कमी करण्यासाठी, कॅमोमाइल किंवा पेपरमिंट चहा प्या. मासिक पाळी दरम्यान असे केल्याने तुम्हाला वेदनांपासून आराम मिळेल. या गोष्टींमध्ये असलेल्या दाहक-विरोधी गुणधर्मांमुळे, मासिक पाळीच्या वेदना कमी होतात आणि हार्मोनल संतुलन देखील राखले जाते. पीरियड क्रॅम्पसाठी व्यायाम करा मासिक पाळीच्या वेदना कमी करण्यासाठी व्यायाम देखील प्रभावी आहे. हे नैसर्गिक पेनकिलरसारखे काम करते. म्हणून, मासिक पाळीत शारीरिकदृष्ट्या सक्रिय रहा.कोमट तेलाने मालिश या दिवसांमध्ये कंबर, ओटीपोट दुखतं अशावेळी कोमट तेलाने मालिश केल्यास तुम्हाला आराम मिळतो. मालिश केल्याने शरीराचे काही पॉईंट्स दाबले जातात त्यामुळे शरीराच्या नसा मोकळ्या होतात.गरम पाण्याने आंघोळ या दिवसात गरम पाण्याने आंघोळ करा. यामुळे शरीराच्या नसा मोकळ्या होतात.हे पदार्थ खाणे टाळा या दिवसांमध्ये चहा, कॉफी, आणि काही शीतपेय टाळावीत.हे पदार्थ खा हर्बल टी, ग्रीन टी, बडीशेप, दालचिनी, आलं, हिरव्या भाज्या, चिकन, मासे, अक्रोड, बदाम, पपई आणि केळी खायला पाहिजे.

# व्ही एस पँथर्स च्या वतीने औसा येथे विविध मागण्यांसाठी रास्ता रोको आंदोलन



औसा: व्ही एस पँथर्स औसा तालुका शाखेच्या वतीने सं अध्यक्ष विनोदभाऊ खटके आणि प्रदेशाध्यक्ष तथा माजी नगरसेवक सचिन मस्के यांच्या मार्गदर्शनाखाली आणि जिल्हाध्यक्ष शरद किणीकर जिल्हाध्यक्ष विशाल गायकवाड संपर्क प्रमुख आनंद जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत औसा तालुका अध्यक्ष सुनील सातपुते यांच्या नेतृत्वाखाली विविध मागण्यांसाठी औसा लातूर रोडवर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले यामध्ये औसा शहरांमध्ये भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्ण कृती पुतळा बसविण्यात यावा आणि याकतपूर रोडवरील मुलींच्या शासकीय वस्तीगृहासमोरील बार आणि लॉज तात्काळ बंद करण्यात यावा, शासकीय नोकर भरती कंपन्या मार्फत न करता महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगामार्फत करण्यात यावी इत्यादी मागण्यासाठी रास्ता रोको आंदोलन करून औसा तालुक्याचे तहसीलदार यांना मागण्याचे निवेदन प्रदान करण्यात आले. या निवेदनाची गंभीर दखल न घेतल्यास यापेक्षाही तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा तालुकाध्यक्ष सुनील सातपुते यांनी दिला.यावेळी जिल्हाउपाध्यक्ष पंकज होळीकर, ऑटो संघटन जिल्हाध्यक्ष देवा गायकवाड,कामगार आघाडी जिल्हा संघटक गोविंद कांबळे, विलास कसबे सह औसा तालुक्यातील व्ही एस पँथर्सचे सुनिल सातपुते तालुकाध्यक्ष संतोष माने (सर)नितीन डोळसे, सुरज सातपुते,आशुतोष बनसोडे, करण कांबळे, रितेश बनसोडे, हिदायत पठाण,सागर शिखरे,सूरज सातपुते,करण कांबळे,कैलास सातपुते, अनिकेत बनसोडे विशाल बनसोडे गोपीनाथ कांबळे अतिश कांबळे प्रेम वाघमारे किरण कांबळे सचिन कांबळे विजय पुंड संघर्ष सातपुते सागर कांबळे यशपाल लोंढे अमोल कांबळे सचिन होळीकर प्रत्येक लोंढे धीरज लोंढे निलेश कांबळे विजू लोंढे पदाधिकारी उपस्थित होते.

# शरीरासाठी घातक आहे हा पदार्थ; होऊ शकतात रक्ताच्या उलट्या अन् बरंच काही..जाणून घ्या

नुकतेच गुरूग्राममधील एका रेस्टॉरंटमध्ये काही लोकांनी माऊथ फ्रेशनर घेतल्यानंतर त्यांना रूग्णालयात दाखल करावे लागले होते. त्यांना माऊथ फ्रेशनरमध्ये ड्राय आईस देण्यात आला होता.या लोकांमध्ये ५ व्यक्तींचा समावेश होता. या पाच जणांनी जेवण केल्यानंतर माऊथ फ्रेशनर खाल्ल्यावर त्यांच्या तोंडात जळजळ व्हायला लागली आणि त्यांच्या तोंडातून रक्त येऊ लागले.त्यानंतर, त्यांना रूग्णालयात दाखल करण्यात आले. ही घटना घडली ती गुरूग्राममधील डर या रेस्टॉरंटमध्ये. या लोकांना माऊथ फ्रेशनर म्हणून चक्क ड्राय आईस देण्यात आल्याचे आता प्राथमिक तपासात समोर आले आहे.ड्राय आईस काय आहे? ड्राय आईसबद्दल आरोग्य तज्ज्ञ सांगतात की, कोरडा बर्फ हा त्याच्या नावाप्रमाणेच कोरडा असतो. हा कोरडा बर्फ कार्बन डायऑक्साइडचे घनरूप आहे. हा कोरडा बर्फ सामान्य बर्फापेक्षा जास्त थंड राहू शकतो आणि दीर्घकाळ टिकू शकतो. विशेष म्हणजे हा बर्फ पाण्यापासून तयार केला जात नाही, हा कोरडा बर्फ वितळल्यानंतर पाण्याऐवजी धूर निघतो. ड्राय आईसचा वापर कुठे केला जातो? ड्राय आईसचा वापर हा कार्बोनेटेड पेये फ्लॅश-फ्रीज करण्यासाठी आणि आईसक्रीमच्या साठवणुकीसाठी केला जातो. त्यासोबतच शिपिंग दरम्यान औषधे साठवण्यासाठी आणि पार्टी, विवाहसोहळ्यांमध्ये धूर किंवा धुक्याचा प्रभाव निर्माण करण्यासाठी देखील केला जातो. यासोबतच एअरलाईन कॅटरिंगमध्ये ताजे अन्न ठेवण्यासाठी या ड्राय आईसचा वापर केला जातो. ड्राय आईस खाल्ला जाऊ शकतो का?ड्राय आईस हा मुळात खूप थंड असतो. त्याच्या थंड प्रभावामुळे आणि कार्बन डायऑक्साईडच्या संभाव्य वायू गळतीमुळे हा कोरडा बर्फ चुकून खाल्ल्यास किंवा गिळल्यास ते अत्यंत धोकादायक ठरू शकते. ड्राय आईसचे सेवन करणे धोकादायक यांसारख्या एजन्सीनुसार, कोरड्या बर्फाचे सेवन कधीच करू नये. जर या कोरड्या बर्फाला स्पर्श केल्यास किंवा तो गिळल्यास त्वचेला आणि शरीरातील अंतर्गत अवयवांना गंभीर नुकसान होऊ शकते. शरीरातील अवयवांमध्ये जळजळ होऊ शकते आणि पेशींना धोका पोहचू शकते.इतकेच नव्हे तर ड्राय आईसचा वापर हा बंद जागेत केल्यास आपल्याला श्वासोच्छवासाचा त्रास (हायपरकॅपनिया) होण्याचा धोका निर्माण होतो.

# माहूरच्या बाबा सोनापीर उरुसाला आजपासून सुरुवात,

किनवट.ता.प्रतिनिधी. (शेख शौकत) माहूरः -तीर्थक्षेत्र ला संताची भूमी म्हणून ही ओळखले जाते. याच माहूर शहरात हिंदू मुस्लिम एकतेचे प्रतीक असलेल्या, हजरत सनाउल्लाह शहा उर्फ सोनापीर बाबा यांची पुरातन दर्गाह आहे. या ठिकाणी दर वर्षी ५ ते १० मार्चला उरूस साजरा केला जातो. मागील ५५ वषार्ची परंपरा असलेल्या या यात्रा उरूस महोत्सवाला मंगळवार दिनांक ५ पासून शाही संदल ने सुरुवात होणार असल्याने तहसीलदार किशोर यादव सपोनी शिवप्रकाश मुळे यांचे सह मान्यवरांनी परिसराची पाहणी केली. सोनापीर बाबाचा उरूस यात्रेची पंचक्रोशीत नागरिकात विशेष आवड असते. या उरूस मध्ये आंध्र, तेलंगानासह राज्यातील विविध जिल्ह्यातील नागरिक हजेरी लावतात. पाच दिवस चालणाऱ्या या यात्रेत लाखो रुपयांची उलाढाल होते. शेकडो हाताना या यात्रेच्या माध्यमातून काम मिळते. यंदा दिनांक ५ मार्च रोजी हैदराबाद येथील सुफी कव्वाल इकबाल शकील वारसी यांची महफिले समा दि. ६ मार्च रोजी नसीम जानी कव्वाल (नागपुर) यांचा तर ७ मार्च रोजी सलीम जावेद कव्वाल मुंबई यांचा कव्वालीचा कार्यक्रम होणार आहे. दिनांक ९ मार्च रोजी कीर्तनकार सप्त खंजरी वादक



तुषार सुर्यवंशी यांचा समाजप्रबोधन चा कार्यक्रम होणार आहे. दि. १० मार्च रोजी इंटरनॅशनल ख्याती चे फेम टिव्ही सिंगर मुराद आतिश यांचा कव्वाली चा कार्यक्रम होणार आहे.या शिवाय दि. ८ रोजी दुपारी कुस्त्यांची दंगल होणार आहे. अशी माहिती प्रसिध्दी पत्रकाद्वारे उरूस कमिटी ने दिली आहे. यावेळी नातं तथा मुख्याधिकारी डॉक्टर राजकुमार राठोड सपोनी संगमनाथ परगेवार पोउपनी आनंदराव वाठोरे मुजावर बाबर शेख फकीर मोहम्मद मनोज कीर्तने यांचे सह मान्यवर उपस्थित होते.

# मुंबईतील पाणी कपातीचे संकट अखेर मागे. मुबई,मुंबई उपनगर पूर्व व पश्चिम उपनगरे ठाणे व भिवंडी सह ६ मार्च पासून पाणीपुरवठा सुरळीत.

मुंबई/शहामत शेख मुंबईत महानगर पालिकेच्या पिसे जल उदंचन केंद्रात ट्रान्सफॉर्मर ला लागलेल्या आगीमुळे बाधित झालेली यंत्राना आता पूर्ववत झाली आहे. सद्यस्थितीत तीन ट्रान्सफॉर्मर सुरू होऊन त्या आधारे सर्व २० पंप सुरु करण्यात आले आहेत. मंगळवारी तिसऱ्या ट्रांसफार्मरवर आधारित पंप देखील पूर्ण क्षमतेने सुरू झाले आहेत. त्यामुळे मुंबई उपनगर. मुंबई शहर, पश्चिम उपनगरे, पूर्व उपनगरे तसेच ठाणे शहर भिवंडी व नगर बाह्य विभाग येथील मुंबई व २ व ३जलवाहिन्यातून होणाऱ्या पाणीपुरवठ्यातील पंधरा टक्के पाणी कपात बुधवार दिनांक ०६ मार्च २०२४ घेत असल्याचे जल अभियंताने घोषित केले आहे.मुंबई महानगरपालिकेच्या पिसे येथील जल उदंचन केंद्रात २६ फेब्रुवारी २०२४ रोजी आग लागल्याने यंत्रणा बाधित झाली होती. त्यानंतर दुरुस्तीचे काम तातडीने सुरू करून टप्प्याटप्प्याने ट्रान्सफॉर्मर व त्यावर आधारित पंप सुरू करण्यात आले. पाणी कपात दुरुस्तीसाठी परीक्षणांअंतर्गत असलेला तिसरा ट्रांसफार्मर नुकताच सुरू झाला असून त्यावर आधारित पंप चालू झाले आहेत अशा रीतीने पिसे केंद्रातील २० पैकी २० पंप कार्यरत झाले आहेत. त्या आधारे पाणीपुरवठा सुरळीत करण्यात येत आहे.तसेच पिसे उदचंद केंद्रासह पांजरापुर जल शुद्धीकरण केंद्र पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्यात आले. परिणामी मुंबई शहर पश्चिम उपनगरे पूर्व उपनगरे ठाणे शहर भिवंडी व नगर बाह्य विभाग येथील मुंबई २ व ३ जल वाहिन्यातून होणाऱ्या पंधरा टक्के पाणी कपात बुधवार दिनांक ६ मार्च २०२४ पासून मागे घेण्यात येत आहे असे महानगरपालिकेकडून जाहीर करण्यात आले.



# शिस्त पाळा अन्यथा कारवाईसाठी सज्ज राहा – स.पो.आयुक्त यशवंत गवारी

सोलापूर : शहरातील वाहतुकीला शिस्त लावण्यासाठी वाहतूक शाखेने धडक कारवाई मोहीम हाती घेतली आहे. जो शिस्त पाळणार नाही त्यांना कडक कारवाईला सामोरे जावे लागेल, असा इशारा नूतन सहा. पोलिस आयुक्त यशवंत गवारी यांनी दिली.वाहतूक शाखेचे सहायक पोलिस आयुक्त राजू मोरे यांच्या बदलीनंतर त्यांच्या जागेवर पुणे ग्रामीण येथील शिरूर विभागाचे पोलिस उप अधीक्षक गवारी यांनी नुकताच पदभार स्वीकारला. त्यांनी यापूर्वी गडचिरोली, पंढरपूर, वैराग, सोलापूर तालुका पोलिस ठाणे येथे सेवा बजावून शिरूर येथे कार्यरत होते.



'पोलिस आयुक्त एम. राज कुमार, उपायुक्त डॉ. अजित बो–हाडे यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतुकीला शिस्त लावण्यासाठी योग्य त्या उपाययोजना केल्या जातील, असे त्यांनी सांगितले.वाहतुकीची कोंडी होणारे चौक निश्चित करून तेथे संबंधित वाहनांवर कठोर कारवाई करण्यात येईल. रिक्षाचालकांची बैठक घेऊन त्यांना ड्रेस कोड व नियम पाळण्याचे आवाहन केले आहे. एसटी स्टँड, रेल्वे स्टेशन अशा गर्दीच्या ठिकाणी वाहतुकीची कोंडी होणार नाही याकडे लक्ष देणार असल्याचे गवारी यांनी स्पष्ट केले.

# उल्हासनगरातील मुस्लिम बांधव येणाऱ्या निवडणुकीत नोटाचे बटन दाबणार

उल्हासनगर / प्रतिनिधी : उल्हासनगर ५ येथे सन १९७४ मध्ये मुस्लिम दफनभूमीची जमीन आरक्षित असताना सुध्दा मुस्लिम समाजाला त्या जमीनीवर दफनविधी करण्यास विरोध होत असल्याने येथील बांधव नाराज झाले आहेत. त्यामुळे येणाऱ्या निवडणुकीत हा समाज नोटाचे बटन दाबुन निषेध करणार आहेत. उल्हासनगर कँप ५ येथील कैलास कॉलनी परिसरात एका जागेवर दफनभूमी साठी जमीन दिली आहे. परंतु त्या परिसरात शिव मंदिर असल्याचे कारण देत विरोध होत आहे. दरम्यान सदर जमीन ही तीन हिस्स्या मध्ये वाटन्यात आली आहे. तर एक हिस्सा दफनभूमी साठी देवुन बाकी जमीन भुमाफियाच्या घशात घातली आहे. दरम्यान त्या जमीनीवर दफनभूमी देण्याची मंजुरी मिळाली आहे. परंतु दफनविधी करण्यास अद्याप पर्यंत मंजुरी देण्यात आली नाही, त्यामुळे येथील मुस्लिम समाज नाराज झाला आहे. उल्हासनगर ५ मध्ये मुस्लिम दफनभूमी साठी जी जमीन आरक्षित ठेवली होती तीच एक जमीन आता शिल्लक आहे . दरम्यान २०२४ मध्ये होणाऱ्या लोकसभा व विधानसभा निवडणुका जाहीर होण्या पुर्वीच मुस्लिम समाजाला दिलेल्या आरक्षित दफनभूमी वर दफनविधी करण्याची मंजूरी दिली नाही, तर सर्व राजकीय पक्षांचा खुला बहिष्कार करुन सर्व मुस्लिम समाज नोटाचे बटन दाबुन आपल्या मताधिकाराचा उपयोग करुन यांचा विरोध करणार असल्याची माहीती पदयात्री ग्रुप ऑफ उल्हासनगर चे समन्वयक श्री अनिल सिंन्हा यांनी दिली आहे .

# आठ दिवसात नागरी समस्या नाही सोडवल्सास वंचित बहूजन आघाडी तर्फे तीव्र आंदोलन करणार...शहर अध्यक्ष इंजि सचिन गायकवाड

## ६ मार्च रोजी शहरातील विविध मागन्यांसाठी वंचित बहूजन आघाडी

लातूर शहरच्या वतीने लातूर म.न.पा.आयूक्त यांना निवेदन देण्यात आले.लातूर शहरात मनपा च्या वतीने महिलांसाठी मोफत सिटी बस चालू केली आहे त्या धरतीवर महिलांना लातूर शहरातील महिलांसाठी स्वतंत्र शहर सिटी बसची व्यवस्था करणे बाबत नियोजन करण्यात आलेले आहे त्यामुळे महिलांची तसेच महाविद्यालय विद्यार्थिनीची प्रचंड गर्दी होऊन त्यांची गैरसोय होत आहे त्याचबरोबर महिलांची गर्दी पाहून शहरातील टवाळखोर वृत्ती मुले हे जाणून बुजून बस मधून प्रवास करत आहेत याचा ना हक त्रास महिला व महाविद्यालयीन विद्यार्थिनींना होत आहे. तरी शहरातील महिलांसाठी स्वतंत्र सिटी बस (पिंक बस) ची व्यवस्था करावी व त्याचबरोबर सिटी बसच्या माध्यमातून होणारा गैरव्यवहाराची चौकशी होऊन योग्य ती कारवाई करण्यात यावी. त्याचबरोबर लातूर शहराच्या उन्हाळ्याची तीव्रता पाहता व धरणातील पाण्याची क्षमता पाहता येणाऱ्या काळात लातूर शहरात पाण्याची टंचाई जाणवण्याचा प्रश्न निर्माण होणार आहे. त्या धरतीवर लातूर शहरातील ज्या विंधिन विहिरी (बोर) चालू आहेत शहरातील काही प्रभागांमध्ये विंधिन विहिरी चालू असून नागरिकांपर्यंत पाणीपुरवठा होत नाही त्या पाण्याची योग्य ती नागरिकांपर्यंत पोहोचण्याची आपल्या पाणीपुरवठा विभागाकडून करण्यात यावी व तसेच शहरातील बंद पडलेल्या विंधिन विहिरी लवकरात लवकर



चालू करून नागरिकांना पाण्याची सोय करण्यात यावी जेणेकरून शहरातील नागरिकांना पाणीटंचाईला सामोरे जावं लागणार नाही. सदरील निवेदनाची दखल घेऊन लवकरात लवकर वरील मागण्या पूर्ण करून नागरिकांची व्यवस्था करण्यात यावी अन्यथा वंचित बहुजन आघाडी लातूर शहरच्या वतिने लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा शहर अध्यक्ष सचिन गायकवाड यांनी दिला आहे..यावेळी शहर जिल्हाध्यक्ष– इंजि.सचिन गायकवाड, उपाध्यक्ष – मुन्ना पठाण,सागर वाडकर,मेहबूब शेख (जीत), सहसंघटक – मनोज लेंढानें,सलमान पठाण,मोईन शेख, सचिव – विशाल कांबळे , आय टी प्रमुख – अभयरत्न गायकवाड ,विशाल सुरवसे, सैफ शेख ,व इतर पदाधिकारी उपस्थित होते...

# परिचारिका संवर्गातील रिक्त पदे सेवाज्येष्ठतेनुसार पदोन्नतीने भरण्यासंदर्भात कार्यवाही करावी – वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ

## महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटनेच्या शिष्टमंडळासोबत दीड तास चर्चा

मागील महिन्यामध्ये महाराष्ट्र राज्य परिचारीका संघटना, मुख्यालय लातूर संघटनेच्या वतीने आझाद मैदानावर भव्य धरणे आंदोलन करण्यात आले होते. त्यावेळी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या मुख्य सचिव यांच्यासोबत बैठक झाली व वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांनी लवकरच बैठक बोलावून निर्णय घेऊ असे आश्वासन दिले होते. त्या अनुषंगाने काल मंत्रालयामध्ये पदाधिकाऱ्यांसोबत बैठक बोलावण्यात आली व सकारात्मक चर्चा झाली. त्यावेळी मंत्री महोदयांनी सर्व प्रश्न मार्गी लावण्याचे खात्री दिली.



अंबाजोगाई (प्रतिनिधी):– परिचारिका संवर्गातील रिक्त पदे सेवाज्येष्ठतेनुसार भरण्यासंदर्भात कार्यवाही करावी,तसेच परिचारिका संवर्गातील सर्व स्तरावरील शुश्रूषा, शैक्षणिक व प्रशासकीय विभागातील व प्राचार्यांची पदे सेवाज्येष्ठतेनुसार भरण्यासंदर्भात कार्यवाही करण्याचे निर्देश वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ यांनी दिले. परिचारीका संवर्गाच्या विविध मागण्यांबाबत मंगळवार दिनांक ५ मार्च रोजी सकाळी साडेअकरा वाजता वैद्यकीय शिक्षण मंत्राच्या दालनात बैठक झाली. यावेळी वैद्यकीय मंत्री हसन मुश्रीफ साहेब यांनी परिचारिकांच्या समस्या सोडविण्यासंदर्भात शासन प्रयत्नशील असल्याचे सांगितले. यावेळी वैद्यकीय शिक्षण विभागाचे आयुक्त राजीव निवतकर, उपसचिव वैशाली सुळे तसेच महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटनेचे राज्याध्यक्ष डॉ मनिषा शिंदे, राज्य उपाध्यक्ष भिमराव चक्रे, राज्य सरचिटणीस सुमित्रा तोटे, राज्य खजिनदार राम सुर्यवंशी, राज्य कार्यकारिणी सदस्य आशा यादव, सेंट जॉर्ज शाखेच्या अध्यक्ष कामिनी सोनवणे, गो.ते. रु शाखेच्या अध्यक्ष स्मिता म्हसकर आदींची उपस्थिती होती. मंत्री मुश्रीफ म्हणाले की, मेट्रन तसेच परिचारिकांच्या रिक्त पदांवर सेवाज्येष्ठतेनुसार पदोन्नती देण्यासाठी रिक्त पदांचा आढावा घेऊन त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करावी. परिचारिकांना शुश्रूषा अधिकारी पदनाम देण्यासंदर्भातील कार्यवाही करण्यात यावी. परिचारिका संवर्गातील कर्मचाऱ्यांना लिपिक संवर्गातील काम देऊ नये तसेच, रिक्त लिपिक पदे भरण्यासंदर्भातील कार्यवाही करण्यात यावी. वैद्यकीय महाविद्यालयात पाळणाघर असणे अत्यावश्यक आहे. परिचारिका संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानाबाबत कार्यवाही सुरू असून, नव्याने बांधण्यात येणाऱ्या निवासस्थानात या कर्मचाऱ्यांना सोयी देण्यात येणार असल्याचेही मंत्री श्री. मुश्रीफ यांनी सांगितले.तसेच सहसंचालक पद निर्मितीसाठी प्रस्ताव सादर करावा, केंद्राप्रमाणे नर्सिंग भत्ते, महात्मा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत देय असलेला भत्ता, गणवेश भत्ता मिळण्यासंदर्भात वित्त विभागाकडे पाठपुरावा करण्याचे निर्देशही मंत्री मुश्रीफ यांनी दिले.याचबरोबर राज्यभरातून मुंबईत कामकाजास्तव येणाऱ्या परिचारीका साठी मुंबईतील रुग्णालयांमध्ये रुम उपलब्ध करुन देण्याबाबत यावी. अंबाजोगाई येथील विद्यार्थी परिचारीकांना विद्यावेतन दिले जात नाही,ते वेळेवर देण्यात यावे अशी मागणी यावेळी करण्यात आली.

# ग्राम विकासासाठी जल, जंगल, जमीन आणि जनावर व्यवस्थापन आवश्यक रासेयो जिल्हा समन्वयक डॉ. केशव अनगुले

लातूर दि. ०६ ग्राम विकासासाठी जल, जंगल, जमीन आणि जनावर यांचे व्यवस्थापन करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन रासेयो लातूर जिल्हा समन्वयक डॉ. केशव अनगुले यांनी केले. महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि ग्रामपंचायात कार्यालय, जवळा बु. यांच्यावतीने आयोजित युवकांचा ध्यास ग्राम शहर विकास या विशेष युवक शिबिराच्या समारोप प्रसंगी ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वरिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे हे होते तर विचारपीठावर माजी प्राचार्य प्रा. गिरजाप्पा मुचाटे, रासेयो सल्लागार प्रा. बी. एस. पळसकर, सरपंच चनबस भुजबळ, उपसरपंच मनोज कापरे, शालेय समितीचे उपाध्यक्ष दत्तप्रसाद बनाळे, पोलीस पाटील डॉ. पी आर. ढगे, तंटामुक्तीचे अध्यक्ष चनबस ब्याळे, प्रगतिशील शेतकरी भैरवनाथ सव्वाशे, पत्रकार दत्ता बनाळे, ग्रामसेवक प्रदीप सूर्यवंशी, कार्यक्रमाधिकारी डॉ. रत्नाकर बेडगे, डॉ. शिवप्रसाद डोंगरे, डॉ. मनोहर चपळे, प्रा. किसनाथ कुडके आदीची उपस्थिती होती. कार्यक्रमाचा प्रारंभ कु. शिवाली मुकडे आणि कृष्णा धरणे यांनी गायलेल्या प्रार्थनेने झाला. पुढे बोलताना डॉ. अनगुले म्हणाले की, भारत हा तरुणांचा देश आहे. सकारात्मक, ध्येयवादी, समर्पित, त्यागी आणि दूरदृष्टीचे तरुण घडवण्याकरिता राष्ट्रीय सेवा योजना ही एक कार्यशाळा आहे. भारताचे महाशक्ती होण्याचे स्वप्न तरुणच पूर्ण करू शकतात असेही ते म्हणाले. यावेळी माजी प्राचार्य प्रा. गिरजाप्पा मुचाटे म्हणाले की, समाज उत्कृष्ट व शाश्वत विकासाच्या कामाची नेहमी दखल घेत असतो. देशभरातील राष्ट्रीय सेवा योजना सामाजिक बांधिलकी जोपासत राष्ट्र विकासाचे काम करत आहे.

यावेळी प्रा. बी. एस. पळसकर म्हणाले की, गावाचे नेतृत्व हे दूरदृष्टी आणि संवेदनशील व्यक्तीकडे असल्यास ग्राम विकास हा निश्चित होतो. मराठवाड्यात जल व्यवस्थापनाचा प्रश्न अत्यंत गंभीर आहे. पावसाचा प्रत्येक थेंब जमिनीत मुरवावा लागेल, प्रत्येक गावात जल संवर्धनाकरिता लघुबंधारे, तलाव, नाला सरलीकरण, रुंदीकरण, पाणलोट, क्षेत्र विकास, वृक्ष संवर्धन करावे लागेल असेही ते म्हणाले




अध्यक्षीय समारोपात उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे म्हणाले की, ग्रामीण भागाच्या विकासात प्रगत बलशाली विकसित देशाची पानमुळे आहेत. ग्रामीण जीवन जितके स्वावलंबी, आत्मनिर्भर आणि स्वयंपूर्ण होईल तितकाच सामर्थ्यशाली भारत उभा राहील. ग्रामीण भारतात प्रचंड ऊर्जा शक्ती आहे. या ऊर्जा शक्तीचा विनीयोग देशाच्या शाश्वत विकासासाठी करायला हवा असेही ते म्हणाले या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व अहवाल वाचन कार्यक्रमाधिकारी डॉ. रत्नाकर बेडगे यांनी केले यावेळी पत्रकार दत्ता बनाळे, कृष्णा धरणे, राखी इंगळे, धनश्री भंडे, शिवानी काळे, अजय राऊत यांनी मनोगते व्यक्त केली. सूत्रसंचालन कार्यक्रमाधिकारी प्रा. किसनाथ कुडके यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रा. डॉ. मनोहर चपळे यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता योगेश मोदी, दत्ता खुणे, व्यंकट खुणे, अजय स्वामी, अजय राऊत, प्रथमेश जाधव, शैलेश जाधव, ऋतुजा भिसे, वैष्णवी कांबळे, धनश्री बंडे, श्रेया बोडके यांच्यासह ग्रामस्थ व स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

# पर्यावरण तज्ञ डॉ. अस्मिता दसपुते यांची पैनगंगा अभयारण्यास भेट,

किनवट.ता.प्रतिनिधी. (शेख शौकत) सरस्वती भुवन एज्युकेशन सोसायटी छत्रपती संभाजी नगर येथील सहयोगी प्राध्यापिका तथा संशोधन मार्गदर्शिका डॉक्टर अस्मिता दसपुते यांनी संशोधन अभ्यासक्रमांतर्गत पैनगंगा अभयारण्यास भेट दिली. यावेळी वाढते तापमान वृक्षतोड कमी होणारी पाणी पातळी पानझडी वृक्ष याबद्दल आपल्या संशोधनात मत व्यक्त केले. यासोबतच पीएचडी संशोधक विद्यार्थी आदित्य जयवंतराव चव्हाण व गिरीश गायकवाड यांना पर्यावरण या विषयावर मार्गदर्शन केले. पर्यावरण क्षेत्रात वन, वन्यपशुशास्त्र, पर्यावरण नियंत्रण, पर्यावरण व्यवस्थापन, ऊर्जाप्रणाली आणि पर्यावरण नियोजन या विषयांशी निगडित करिअरच्या अनेक संधी उपलब्ध असून या क्षेत्रात विद्यार्थ्यांनी यावे असे आव्हान त्यांनी केले.

प्रदूषण आणि त्यांचे प्राणीजीवनावर होणारे परिणाम यांचा या अभ्यासक्रमांमध्ये अंतर्भाव आहेच. खरे तर जीवनाला स्पर्श करणाऱ्या प्रत्येक विषयाचा पर्यावरणशास्त्रात समावेश होत असतो. पर्यावरण संरक्षणाच्या क्षेत्रात नोकरीच्या अनेक संधी आहेत. भूमी, हवा आणि पाणी यांचे प्रदूषणापासून प्रतिबंध करणे हे पर्यावरणवाद्यांचे प्राथमिक कार्य मानले जाते. त्यासाठी त्यांना प्रदूषित क्षेत्राची तपासणी करण्याचे, विश्लेषण करण्याचे किती प्रमाणात नुकसान झाले




आहे त्याचा आढावा घेणे, अहवाल तयार करणे आणि उपाययोजना करणे यासारखी कामे करावी लागतात. आधुनिक विज्ञानाच्या आधारावर कृत्रिम उपग्रह तंत्रज्ञानाचा वापर करून पर्यावरणाचा ऱ्हस् थांबवू शकतो. फक्त पर्यावरण शास्त्रज्ञांनाच नव्हे तर पर्यावरण अभियंते, पर्यावरण जीवशास्त्रज्ञ, पर्यावरणाच्या प्रतिकृती तयार करणारे व पर्यावरणाशी संबंधित पत्रकारिता करणाऱ्यांना मोठा वाव असल्याचे याप्रसंगी त्यांनी बोलून दाखवले. याप्रसंगी वनरक्षक संदीप पोतुलवार यांनी विविध वृक्ष प्राणी या विषयी माहिती दिली.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE